माणुस
स्वत:च
स्वत:चा
भाग्यविधाता
असतो.


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १० जुले २०२५ | अंक २०२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# आमची कागदपत्रं अडवली तर जरांगे पाटील पुन्हा कडाडले, सरकारला नवा इशारा काय?

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला, त्यांनी अनेकदा उपोषण देखील केलं. दरम्यान त्यांनी आता पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. काही दिवसांपूर्वीच अंतरवाली सराटी येथे राज्यव्यापी बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं, या बैठकीला राज्यभरातील मराठा बांधव उपस्थित होते. या बैठकीममध्ये मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईमध्ये होणाऱ्या आंदोलनाची घोषणा केली आहे. आता मराठा समजाला कोणीही रोखू शकत नाही, विजय मिळूनच गुलाल फेकायचा, अंतिम लढाई आहे, आरपारची लढाई आहे, असंही त्यांनी यावेळी म्हटलं होतं.

29 ऑगस्टला मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात हा मराठी समाजाचा मोर्चा मुंबईमध्ये धडकणार आहे. 27 ऑगस्टला हा मोर्चा अंतरवाली सराटी येथून निघणार आहे. त्यानंतर तो 29 ऑगस्ट रोजी मुंबईत पोहोचणार आहे. दरम्यान आता या मोर्चाची तयारी सुरू आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील हे चावडी बैठका घेत आहेत, धाराशिव जिल्ह्यातल्या कार या



गावात जरांगे पाटील यांची बैठक पार पडली, या बैठकीत बोलताना त्यांनी पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारला इशारा दिला आहे.

## नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?

आमची कागदपत्रं अडवली तर आम्ही शासकीय कार्यालयाला घेराव घालणार आहोत, मराठ्यांच्या मुलांचं नुकसान होत असेल तर आम्ही गप्प बसणार नाहीत, आमच्या लेकरांचं वाटोळ होत असेल तर आम्हालाही कळतं सरकारला कस नीट करायचं, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्यावर देखील आरोप केला आहे. कुणबी सर्टिफिकेट देऊ नयेत यासाठी संजय शिरसाट हे अधिकाऱ्यांवर दबाव आणत असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे.

## मुंबईचा जाण्याचा मार्ग

आंतरवलीतून 27 ऑगस्टला निघाल्यानंतर शहागड, पैठण, शेवगाव, पांढरीपूल, अहिल्यानगर नेप्टी नाका मार्गे, आळेफाटा, शिवनेरी दर्शन, माळशेज घाट, कल्याण, वाशी, चेंबूर, मंत्रालय

पर्यायी मार्ग पैठण,गंगापूर,वैजापूर,येवला,नाशिक, मुंबई

# श्री दत्त संस्थान बालाघाट येथे गुरू पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा

बीड । श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसु ंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान



कपिलधारवाडी (मांजरसु ंबा) येथे गुरुवार दि. १० /०७/ २०२५ रोजी गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा आयोजित केला आहे.तसेच संगीत भजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे. याबरोबरच गुरु पूजन सोहळा होणार आहे. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे संस्थांनचे दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांनी कळवले आहे.या गुरु पौर्णिमा उत्सवात अजब श्रीकृष्ण उद्धवराव यांची अन्नदान होणार आहे. तरी भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# श्री.विठ्ठल बिरुदेव यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित रहा : शिंपले

दरवर्षीप्रमाणे या वर्षी श्री.विठ्ठल बिरुदेव यात्रा महोत्सव याही वर्षी मोठ्या आनंदमय वातावरणामध्ये होणार आहे. यानिमित्ताने पंचक्रोशीतील समाज बांधवांनी व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन बी एस फोटो स्टु डिओ सर्वेसर्वा बाबू शिंपले यांच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, रविवारी दिनांक १३/०७/२०२५ रोजी श्री. विठ्ठल बिरुदेव यात्रेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचे स्वरूप लोखंडी वस्ती येथून सुशील व्यंकटी लोकरे यांच्या राहत्या निवासापासुन श्री.विठ्ठल बिरुदेव या ग्र ंथाचे वाचन तसेच ग्र ंथाची आरती करून परज निघणार आहे. ढोल व झांज त्याचप्रमाणे धनगरी वाद्यांच्या मोठ्या जय घोषात व भंडा-याची उधळण करत शहरातील प्रमुख मार्गावरून ही मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही परज व वारू मध्ये मोठ्या प्रमाणावर धनगर समाज बांधव सहभागी होऊन मोठा मारुती ते आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुढे आणाभाऊ साठे चौकातुन पुढे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकाकडे रवाना होणार आहे. खंडोबा मंदिरापासून बिरुदेव मंदिर कडे जाणार मंदिरामध्ये गेल्यानंतर तिथे धनगरी नृत्य आणि वारू चा कार्यक्रम होईल त्यानंतर महाआरती झाल्या नंतर भव्य असे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील व वडवणी शहरातील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी व कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान बाबू शिंपले यांनी केले आहे.

# पाणसंचयासाठी शेततळ्याचे प्रात्यक्षिक कार्यक्रमास चांगला प्रतिसाद



कृषीप्रधान असलेल्या रायगड जिल्ह्यातील भूमिपुत्र शेतकऱ्यांना प्रगत व शाश्वत शेतीच्या दिशेने मार्गदर्शन मिळावे,तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञान ,कृषी संशोधन आणि नवीनतम शेततंत्र याची माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न कृषी महाविद्यालय मोहोप्रे रायगड येथील अंतिम वर्षाच्या कृषी कन्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेततळ्याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. शेतकऱ्यांना शेततळे बांधणी संबंधी तांत्रिक मार्गदर्शन देण्यात आले तसेच पावसाचे पाणी साठवून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर कसा केला जातो व दुष्काळी परिस्थितीला पाणीपुरवठा करण्यासाठी शेततळ्याचे महत्त्व समजावून देण्यात आले. यावेळी नाते गावातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले. कृषी महाविद्यालय मोहोप्रे चे प्राचार्य डॉ.व्हि.जे. गिम्हवणेकर आणि कार्यक्रम समन्वयक प्रा.व्ही. आर. पवार,कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एस .रायकर व विषय तज्ञ डॉ.व्हि.आर. बिरवटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेततळ्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा संप

महाराष्ट्र राज्य मासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने सरकारी वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्याच्या केंद्र व राज्य शासनाच्या धोरणाविरोधात कडक भूमिका घेऊन याच्या निषेधार्थ आणि आदी मागण्यांसाठी संप पुकारला असून, बीड येथे अनेक कर्मचारी यात सहभागी झाले आहेत. मु ंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागात खाजगी उद्योजकांना वीज





वितरणाचा समांतर परवाना देऊ नये, रिस्ट्रक्चरिंगच्या नावाखाली महावितरण कंपनीमधील स्थायी पदे नष्ट करण्याचे धोरण थांबवावे राज्यातील ३२९ विद्युत उपकेंद्राचे खाजगीकरण करण्याची बेकायदेशीर कार्यवाही त्वरित बंद करावी, महावितरण मधील ३२ हजार रिक्त पदे विशेष भरती मोहिमे अंतर्गत मागासवर्गीयांच्या अनुशेषासह भरण्यात यावी, कर्मचारी भरती तीन वर्षाकरिता कंत्राटी पद्धतीने न करता स्थायी स्वरूपात करण्यात यावी, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गासह आरक्षित प्रवर्गातून पदोन्नतीमध्ये आरक्षण त्वरित लागू करावे या मागणीसाठी संप पुकारण्यात आला आहे. या संपामध्ये जिल्ह्यातील अनेक कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# बीड शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त नगर परिषद कधी करणार? : शेख युनूस



शहरात नगर परिषद चे दुर्लक्ष असल्यामुळे मोकाट जनावरांची संख्या वाढत आहे. रस्त्याच्या मधोमध जनावरे बसत असून वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून त्यामुळे छोटे-मोठे अपघात पण होतात. शहरातील वाढती लोकसंख्या व त्याचप्रमाणे वाहनाची संख्याही वाढत आहे व काही जागेवर अतिक्र मामुळे रस्ते अरुंद आहे.त्यामुळे शहरातून गाडी चालवणे कठीण व धोक्याचे झाले आहे. बघावे त्या ठिकाणी रस्त्यावर मोकाट जनावरांचे कळप दिसून येत असून याकडे नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांनी लक्ष देण्याची गरज आहे. तसेच जनावराचा बंदोबस्त करण्यात यावा.अशी मागणी नागरिकांतून होत आह

# परळी तालुक्यात पिंपळगाव (गाढे) जि.प शाळेत लाखोंचा भ्रष्टाचार!

**तीन डॉक्टरचा बापच निघाला भ्रष्टाचारी मुख्याध्यापक घुगेच निघाला भ्रष्टाचारी याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष देणार का?**

परळी तालुक्यातील पिंपळगाव (गाढे ) येथील जिल्हा परिषद शाळेत तत्कालीन मुख्याध्यापक अशोक विठ्ठल घुगे यांनी पीएमश्री योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे . केंद्र सरकारने परळी तालुक्यातील एकमेव अशी पिंपळगाव (गाढे ) येथील शाळेची नियुक्ती केली होती मा पिंपळगाव (गाढे ) जि प केंद्रीय शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक अशोक विठ्ठल घुगे यांनी स्वतःची मनमानी करून शासनाचा आलेला निधी विद्यार्थी व शाळेच्या विकासासाठी खर्च न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी स्वतः च्या खाजगी व्यवहारात वापरला व स्वतःच्या वैयक्तिक खात्यात १६ महिने अगोदर पीएमश्री योजनेचा निधी स्वतः च्या बँक खात्यात वर्ग करून घेतला आहे या भ्रष्टाचारात जि प शाळा पिंपळगाव (गाढे ) येथील केंद्रप्रमुख काही शिक्षक व तालुक्यातील वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असल्याचा आरोप पिंपळगाव (गाढे )येथील पालक व विद्यार्थी यांनी केला आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी पिंपळगाव (गाढे ) येथील माजी सरपंच शरद राडकर यांनी तक्रार केली होती मात्र तक्राच्या अनुषंगाने एक गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके यांनी चौकशी पथक नेमले मात्र चौकशी पथकाने केली कार्यवाही अद्यापही गुलदस्त्याचत असल्याचे बोलले जात आहे याकडे जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही याकडे लक्ष देऊन तत्कालीन मुख्याध्यापक अशोक विठ्ठल घुगे याने आतापर्यंत भ्रष्टाचार करून लाखोंची कमाई केल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे यांची भ्रष्टाचार करून कमविलेल्या मायेचीचौकशी करून कारवाई करावी अन्यथा पत्रकारांच्या वतीने मुख्यमंत्री ,केंद्रीय शिक्षण मंत्री , शिक्षण मंत्री मु ंबई,बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे व माजी मंत्री धनंजय मु ंडे व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी , तहसीलदार परळी , गटविकास अधिकारी परळी यांना निवेदन देण्यात येणार आहे.

दैनिक लोकआरंभ — लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# गुरु पौर्णिमा

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ट्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरु देव नमः अशी आपण गुरुंची ओळख करून देतो. गुरु म्हणजे काय ? गुरुंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरुंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील.आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

श्याम बसप्पा ठाणेदार दौंड जिल्हा पुणे

# नागरिकांना सर्व सुविधा गतिमानेतेने देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## परळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

## शेतकरी, विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



### तालुका क्रीडा संकुल, औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट

टोकवाडी येथील समाधान शिबिरानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व महसूल अधिकारी यांच्यासह तालुका क्रीडा संकुल परळी येथील जागेची पाहणी केली. तसेच औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट दिली . यावेळी त्यांच्यासोबत मुख्य अभियंता सुनील इंगोले व मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे देखील उपस्थित होते . दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी यांनी सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांची तालुकास्तरीय आढावा बैठक घेतली. सायंकाळी उशिरापर्यंत धर्मापुरी येथील किल्ला व केदारेश्वर मंदिर तसेच मरळसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर येथे भेट देऊन पुरातत्त्व विभागाचे वतीने चालू असलेल्या कामाची पाहणी करून गावकऱ्यांशी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी संवाद साधला.

बीड, दिनांक 09 शेतकरी , सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तत्पर व गतिमान पद्धतीने देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. सर्व नागरिक यांनी दर सोमवारी व गुरुवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत होणाऱ्या जनता दरबारमध्ये आपल्या समस्या रास्तपणे प्रशासनाकडे मांडव्यात, त्यांचे निराकरण तात्काळ करण्यात येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना दिला. परळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टोकवाडी येथे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत महसूल विभागाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बालविवाह रोखणे व व्यसनमुक्तीबाबत शपथही नागरिकांना त्यांनी दिली. यावेळी परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार वेंकटेश मुंडे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, परवीन पठाण, राजाभाऊ ढगे, सरपंच गोदावरी राजाराम मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू उर्फ बालाजी मुंडे, श्याम आघाव, डॉक्टर नामदेवा आघाव, डॉक्टर सतीश घुगे, पोलीस निरीक्षक मझर सय्यद, मंडळ अधिकारी अरबी कुमटकर, मंगल मुंडे, नीता कोल्हेवाड, गणेश फड, विस्तार अधिकारी अंभोरे, तालुका कृषी अधिकारी राठोड, अव्वल कारकून बालाजी कचरे व सर्व तलाठी यांची उपस्थिती होती. शिबिरात वारस फेरफार व सातबारा 21 शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. इतर हक्कात नोंदी दुरुस्त केलेली सातबारा 13 शेतकऱ्यांना सातबारा वितरित केले . शेतरस्ते नोंदी केलेल्या तीन शेतरस्ता सातबारा शेतकऱ्यांना व्यतिरिक्त केले . 40 विद्यार्थ्यांना उत्पन्न, रहिवासी ,जातीचे प्रमाणपत्र ,नॉन क्रिमिलियर व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीत वीज पडून मयत झालेल्या जनावरांच्या मौजे दौनापूर व गुट्टेवाडी शेतमालकास शासकीय मदत देण्यात आली. मौजे बोरखेड येथील शेतकरी आत्महत्या कुटुंबास व मौजे सारडगाव येथील वीज पडुन जखमी झालेल्या व्यक्तीस शासकीय अनुदान मदत देण्यात आली . महिला व बाल विकास विभागाकडून चार लाभार्थ्यास बेबी किट वाटप करण्यात आले. तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त मौजे मालेवाडी कुटेवाडी वाघाळा येथील चार कुटुंबीयांना तूर बियाणे मिनी किट वाटप करण्यात आले . मोजणी खात्याकडून गावठाण हद्दीतील 10 शेतकऱ्यांना सनद वाटप व नकाशे यांचे वितरण केले. एकूण 99 शेतकरी व विद्यार्थी यांना विविध लाभाचे वितरण जिल्हाधिकारी जॉन्सन व अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार आघाव यांनी मानले. परळी व पिंपळगाव गाढे या मंडळातील अनेक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आठवीच्या वर्गाचे उदघाटन जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून शाळेत नव्यानेच मान्यता मिळालेल्या आठव्या वर्गाचे उद्घाटनही झाले. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात विविध महिला बचत गटाचे, तसेच महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग , पंचायत समिती विभागाचे विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्याचबरोबर सामाजिक अर्थसहाय्य योजना व पुरवठा विभागाचे लाभार्थी, शेतकरी फार्मर आयडी व डीबीटी करिता विशेष पथकाचे कॅम्प उभारण्यात आले होते .

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवाभाऊ महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेला पाचशे रुपयाचा स्टॅम्प रद्द

### या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून याचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी. महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस उर्फ देवा भाऊ यांनी व महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील शेतकरी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांना ५०० रुपयांचा स्टॅम्प आता इथून पुढे शासकीय कार्यालयामध्ये शपथपत्र म्हणून द्यावा लागणार नाही असा शेतकरी हिताचा व विद्यार्थी हिताचा असा महत्त्वपूर्ण निर्णय पाचशे रुपयाचा शपथपत्र स्टॅम्प रद्द करून हा सरकारने निर्णय घेतला आहे आणि कोणालाही इथून पुढे शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये पाचशे रुपयाचा स्टॅम्प देण्याची आवश्यकता नसल्याचाही आता शासन निर्णयामध्ये सांगितले आहे आणि तसा जीआर देखील मा श्री मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व कॅबिनेट महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे साहेब बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व महसूल राज्यमंत्री यांनी महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये पाठवलेला आहे म्हणून या उत्कृष्ट निर्णयाचे महाराष्ट्र मधून सर्व शेतकरी बांधवांमधून तसेच विद्यार्थ्यांमधून विद्यार्थ्यांनी मधून कौतुक होत आहे याच



पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांना व विद्यार्थी विद्यार्थिनींना यांना आवाहन केले आहे म हाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवा भाऊ व महसूल मंत्री चंद्रकांत जी बावनकुळे साहेब तसेच बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन मंत्री सन्माननीय पंकजाताई मुंडे व महसूल राज्यमंत्री यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून सर्व शेतकऱ्यांच्या हिताचे व फायद्याचे भाजपचे सरकार निर्णय घेत आहे म्हणून बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधव यांनी व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी कुठे ही शासकीय कार्यालयामध्ये किंवा निम शासकीय कार्यालयामध्ये पाचशे रुपयाची शपथपत्र स्टॅम्प देऊ नये अथवा कोणी अशी मागणी करत असेल तर तात्काळ भारतीय जनता पार्टी कार्यालय बीड येथे आमच्याशी संपर्क करावा असे आव्हान देखील प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी तमाम बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना केले आहे.

# आषाढी एकादशी निमित्त नाथ फाऊंडेशन च्या रक्तदान शिबीरात ११० रक्तदात्यांचा उस्फुर्त प्रतिसाद.

वडवणी । वार्ताहर नाथ फाऊंडेशन ही सामाजिक संस्था मागील नऊ वर्षापासून आषाढी एकादशीनिमित्त पोखरी (मैं)ता बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजित करतात या यावर्षी देखील नाथ फाऊंडेशन च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी उस्फुर्त प्रतिसाद देत ११० रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात आपले अमूल्य रक्त देऊन गरजवंतांची गरज नाथ फाऊंडेशन च्या माध्यमातून रक्ताची गरज भागवणार असल्याने समाधान त्यांच्या भाषणातून दिसून आले.रक्तदान शिबीराला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक लोकांनी भेटून शुभेच्छा दिल्या.बीड जिल्हा रूग्णालयाच्या रक्तदान पेढी कर्मचाऱ्यांनी नाथ फाऊंडेशन चे सर्व पदाधिकारी हितचिंतक यांनी रक्तदानासाठी परिश्रम घेतले नाथ फाऊंडेशन ही सामाजिक संस्था मागील दहा वर्षांपासून आरोग्य शिक्षण व वृक्षारोपण वृक्षसंवर्धन यावर काम करत असुन जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य, महिला आरोग्य तपासणी तसेच सामाजिक ठिकाणी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करत आहे.या कामासाठी समाजातील अनेक दाणशुर या संस्थेला मदत करत असल्याने नाथ फाऊंडेशन गरीबांच्या उद्धारासाठी कामं करत आहे.नाथ फाऊंडेशन च्या वतीने मागील नऊ वर्षापासून आषाढी एकादशी निमित्त थोरले विठ्ठल रखुमाई मंदिर पोखरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते.नाथ फाऊंडेशन च्या रक्तदान शिबीरात रक्तदान केले आणि रक्ताची गरज पडली की नाथ फाऊंडेशन चे सदस्य पाहिजे त्या ठिकाणी रक्ताची सोय करत असल्याने नाथ फाऊंडेशन




च्या रक्तदान शिबीरात उस्फुर्त प्रतिसाद देतात या वर्षी पण नाथ फाऊंडेशन ने प्रतिवर्षी प्रमाणे ठेवलेल्या रक्तदान शिबीरात ११० रक्तदात्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला नवरा बायको अशा चार जोडी,आठ महिला, दोन तरूणी,एक ६३वर्षांच्या तरुणांनेही रक्तदान केले विशेष बाब म्हणजे राज्याबाहेरील रेल्वेच्या दोन अधिकारी यांनी पण रक्तदान केले नाथ फाऊंडेशन च्या सामाजिक उपक्रमात सर्व समाजातील शिक्षित, अशिक्षित,लोक विश्वास ठेऊन सहभागी होत असल्याचे अध्यक्ष संतोषकुमार तापडिया, उपाध्यक्ष डॉ दिनकर बोंगाणे, कोषाध्यक्ष धनंजय गु ंदेकर, सचिव प्रल्हाद बादाडे, सतिश लांडे, अशोक चव्हाण, गोकर्ण करांडे यांनी मनोमन आभार मानले.बीड जिल्हा रूग्णालयाच्या रक्तदान पेढीच्या सर्व कर्मचारी यांनी तसेच पोखरी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी खूप परिश्रम घेत रक्तदान शिबीर यशस्वी झाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० जुले २०२५
https://lokaarambh.com



# मटका जुगारावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

माजलगांव। प्रतिनिधी शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलीसांनी माजलगांव शहरातील जाजु हॉस्पीटलसमोर शिवाजीनगर परीसरात दुपारी छापा मारुन मटका जुगार खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोकनगर माजलगांव याचे ताब्यातुन कल्यान मटका जुगाराचे साहीत्य व नगदी पैसे व मोबाईल असा एकुण १३,९५०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मटका खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोकनगर माजलगांव व बुकीमालक शुभम डाके रा. माजलगांव यांच्या विरुध्द गु.र.नं.२५२/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरव राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गेवराई अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहवा/माधव तोटेवाड, पोलीस अंमलदार सुनिल गवळी, अंगद घोडके यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तीन अर्ज प्राप्त

बीड-प्रतिनिधी जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये ०३ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे लघु पाटबंधारे विभागाशी संबधित एक अर्ज, जिल्हा अधिक्षक विभागाशी संबधित एक अर्ज आणि जिल्हा भूमीलेख विभागाशी संबधित एक अर्ज असे एकूण तीन तक्रार अर्ज जिल्हा लोकशही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.






माजलगाव तालुक्यातील उपविभागीय कार्यालय या ठिकाणी दि,१४.७.२०२५.वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ, बाबासाहेब आंबेडकर चौक ते माजलगाव उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने इशारा मोर्चा होणार आहे. विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, या मोर्चाचे नेतृत्व राजेश भाऊ क्षीरसागर साहेब करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान लखन पांडुरंग थडके यांनी केले आहे.

# मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे काम पूर्ण करा-अॅड.नरसिंह जाधव

**पाटोदा-प्रतिनिधी शासनाचे ३ कोटी रु उचलून मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे काम अजूनही अपुरेच आहे. पाटोदा शहरातील नागरिकांना सदरील पूलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करून वापर करण्यासाठी उपलब्ध करून देणे बाबत, राष्ट्र वादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार साहेब, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त, छ. संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्य अधिकारी, नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन दिले आहे. पाटोदा येथाल मांजरा नदीवर पूल कम बंधारा याचे तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर होऊन सदरील काम नगरपंचायत पाटोदा यांच्यामार्फत करण्यात आले होते. परंतु संबंधित ठेकेदार यांनी संपूर्ण तीन कोटी रुपये उचलून पुलाचे अर्धवट बांधकाम केले आहे. सदरील प्रकरणांमध्ये तांत्रिक मान्यता बोगस केल्यामुळे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे जनहीत याचिका क्र. ०३/२०२२ दाखल झाली होती. यामध्ये न्यायालयाच्या आदेशाने नगरपंचायत मुख्य अधिकारी व इतर कर्मचाऱ्यासहित संबंधित ठेकेदार यांच्यावर पाटोदा पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा क्र.२१२/२०२२ दाखल होऊन पाटोदा प्रथम वर्ग दंडधिकारी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे, पाटोदा शहरातील नागरिकांसाठी जो पूल कम बांधरा होणार होता तो न झाल्यामुळे संबंधित भागातील शेतकरी व नागरिक यांना येण्या जाण्यासाठी खूप त्रास होत आहे. तसेच शासनाने संबंधित कामावर तीन कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सदरील पैसा हा जनतेचा पैसा आहे त्याचा अपव्यय झालेला आहे. परंतु उर्वरित काम होण्यासाठी यापूर्वी नगरपंचायत च्या वतीने ६५ लक्ष रुपयाची अतिरिक्त मागणी करण्यात आली होती. तेव्हा उर्वरित काम होण्यासाठी ६५ लक्ष किंवा सध्याच्या मार्केट प्रमाणे जो काही खर्च येणार आहे, तो शासनाने त्वरित उपलब्ध करून द्यावा व सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करावे व जनतेला सदरील पूल कम बंधारा तयार करून जनतेच्या वापरासाठी खुला करून द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.**

# राज्यात लवकरच मेगा भरती; १५० दिवसांचे उद्दिष्ट, रिक्त पदांची भरती मार्गी

मुंबई राज्यातील शासकीय विभागांतील रिक्त पदांवर भरती लवकरच सुरू होणार असून, त्यासाठी १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. यामध्ये आकृतीबंध सुधारणा, नियुक्ती नियम अद्ययावत करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे आदी महत्त्वाचे टप्पे निश्चित करण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. ७५ हजार पदांसाठी भरती; एक लाखांहून अधिक निवड फडणवीस म्हणाले की, मागील काळात जाहीर करण्यात आलेल्या ७५ हजार पदांच्या भरतीच्या कार्यक्रमाअंतर्गत एक लाखांपेक्षा जास्त पदे भरली गेली आहेत. राज्य सरकार कोणत्याही परिस्थितीत भरती प्रक्रियेबाबत मागे हटणार नाही, असा विश्वासही त्यांनी दिला. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी विशेष भरती विधानसभेत सदस्य भीमराव केराम यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. चर्चेदरम्यान डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांसारख्या सदस्यांनीही मुद्दे मांडले. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६,८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र न सादर करता कार्यरत असलेले कर्मचारी कार्यरत आहेत, पण



त्यांना बढती मिळणार नाही. मात्र मानवतावादी दृष्टीकोनातून ही पदे अधिसंख्य मानण्यात आली आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ही पदे रिक्त मानली जातील. गतीने आणि पारदर्शकतेने जात वैधता पडताळणी अनुसूचित जमाती प्रवर्गातील भरतीसाठी बिंदूनामावलीनुसार एकही पद रिक्त ठेवले जाणार नाही. तसेच ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे एकत्रित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगवान आणि पारदर्शक होईल. सचिवांचा विशेष अभ्यासगट स्थापन जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेतील अडथळे दूर करण्यासाठी सचिवांचा अभ्यासगट तयार करण्यात येणार असून, हा गट कामाचा सखोल अभ्यास करून सुधारणा सुचवेल. राज्यातील बेरोजगार उमेदवारांसाठी ही बातमी आशादायक ठरणार असून, येत्या काही महिन्यांत राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे, हे निश्चित दिसत आहे.

# कर्तव्यनिष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांची गौरवशाली सेवा संपन्न

बीड-प्रतिनिधी शिरुर (का.) येथे कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी चौधरी हे वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा कुटूंब परिवार, पोलीस कर्मचारी, मित्रवृ ंद,गावकरी यांच्या वतीने हॉटेल गोल्डन चॉईस येथे सेवानिवृत्ती समारंभ सन्माचा कार्यक्रम घेण्यात आला. शिवाजी चौधरी यांनी पोलिस मुख्यालय बीड शहर पोलिस ठाणे बीड ग्रामीण ठाणे, पिंपळनेर पोलीस ठाणे व शिरूर कासार पोलिस ठाणे येथे नोकरी केली असुन त्यांना सेवानिवृत्तीचा निरोप देतांना अनेकांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांची उपस्थिती होती त्यांनी बोलतांना म्हटले की संघर्ष, गरीबी आणि कष्टातून उभा राहिलेले व्यक्तीमत्व ज्यांच्याकडे पाहिले की अनेकांना त्यांच्याकडून काम करण्याचे स्पिरीट मिळते असे शिवाजी चौधरी यांनी केलेल्या प्रामाणिकपणे कामाची पावती म्हणजे या





कार्यक्रमाला उपस्थित राहीलेले प्रचंड संख्येने मान्यवर आणि गावकरी आहेत. तसेच यावेळी कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर वैद्यकीय तज्ञ डॉ.साहेबराव भोपळे, बंगाली पिंपळाचे सरपंच तुकाराम तळेकर, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये, शिवाजी भारती, पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, पोलिस उपनिरीक्षक वसंत जायभाये, पोलिस उपनिरीक्षक इंगळे, पोलिस उपनिरीक्षक शेळके, पोलिस उपनिरीक्षक वाघमारे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक नवनाथ ढाकणे, भिसे, पोलीस फौजदार जायभाये, नवनाथ चौधरी, अजु ्न चौधरी, छगन चौधरी, भिमराव चौधरी, सावता गवळी, अंकुश गवळी, बाळु गवळी, तुकाराम काळे, बाळु बन, सुदाकर सानप, सुपेकर सर, बाबासाहेब दुधाळ, श्री.घुगे,जमादार लोणकेसर, श्री.आंधळेसर यांची उपस्थिती होती. यावेळी हरिभाऊ बांगर, पोलीस हवालदार सारुक, पोलीस हवालदार लोणके, सहाय्यक फौजदार राम यादव, पोलीस हवालदार माणिक तांदळे, डॉ.साहेबराव भोपळे, सहाय्यक फौजदार मच्छिंद्र खाडे, सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर सानप सर, फौजी तांदळे सर, शहादेव सुपेकर, एस.टी. विभागाचे मेकॅनिक शहादेव दुधाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

# महाराष्ट्रातील अकार्यक्षम त्रिमूर्ती सरकार कृषी कायदा कधी तयार करणार ?-वसंत मुंडे

परळी-प्रतिनिधी महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ असून शेतीमालाच्या आयात निर्यात धोरण चुकीचे आहे,अप्रमणिक भेसळ युक्त बी बियाणे कीटकनाशके खते कंपन्याबरोबर टक्केवारी घेऊन संगणत असल्यामुळे आर्थिक व्यवहाराचे सोनेरी टोळक्याने कृषी कायदा करण्यात येऊ नये म्हणून दबाव तंत्राचा वापर करून कायदा करण्यास त्रिमूर्ती सरकार अकार्यक्षम असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. निसर्गाची साथ नसल्यामुळे शेतकऱ्याला दुबार पेरणीचे संकट उभे राहिले असून बी बियाणे खते कीटकनाशके औषधी इत्यादी साहित्य बाजारपेठेत बोगस आलेले असून शासन स्तरावरून कायदेशीर कारवाई केली जात नाही, कृषी मंत्रालय ते तालुका कृषी गुण नियंत्रक विभागापर्यंत विविध कंपन्या एजंट दुकानदार मार्फत आर्थिक व्यवहार केले जात आहेत, कारण बोगस खते बी बियाणे कंपन्यावर दुकानदारावर एजंट वर कारवाई केली जात नाही. गेली दोन वर्षापासून महाराष्ट्रामधील त्रिमूर्ती अपयशी सरकार शेतकऱ्याचा कायदा करण्यास संथ गतीने कारवाई करीत आहे. संयुक्त चिकित्सा समितीचा रिपोर्ट वर कायदा तयार केला जात नाही. अकार्यक्षम आजी-माजी कृषीमंत्री प्रधान सचिव कृषी आयुक्त संचालक खरे दोषी आहेत. कृषी खात्यामध्ये सर्वच प्रकरणात टक्केवारीचा गोंधळ असल्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक जीवन उध्वस्त झाले. शेतीमालाचे बाजार हामीदर जाहीर केला जातो

# कोल्हापुरात धक्कादायक घटना; मुख्याध्यापकाने विहिरीत उडी घेऊन संपवलं जीवन, शिक्षणक्षेत्रात खळबळ

प्रतिनिधीमारुती व्हरकट असं या मुख्याध्यापकाचं नाव असून त्यांनी आत्महत्या केल्याने शहरात आणि शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. कोल्हापूर : राज्यात गेल्या काही दिवसांत शिक्षक आणि शिक्षण (Education) क्षेत्रातील हत्या व आत्महत्येच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. आता, कोल्हापूर (Kolhapur) जिल्ह्यातील कागलमध्ये एका मुख्याध्यापकाने विहिरीत उडी घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी (Police) संबंधित विहिरीजवळ जाऊन मृतदेह बाहेर काढला. यावेळी,



मोठ्या प्रमाणात स्थानिक नागरिकांनी घटनास्थळावर धाव घेतली होती. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. मारुती व्हरकट असं या मुख्याध्यापकाचं नाव असून त्यांनी आत्महत्या केल्याने शहरात आणि शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. तसेच, अग्निशमन विभागाच्या जवानांच्या मदतीने आज सकाळी मृतदेह विहरीतून बाहेर काढण्यात आला. विशेष म्हणे कागल नगरपालिकेच्या शाळेत हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यामुळे, व्हरकट यांच्या आत्महत्येमागेचं नेमकं कारण काय? असा प्रश्न कुटुबीयांसह नातेवाईकांना देखील पडला आहे. दरम्यान, आत्महत्येचं कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. मृतदेह रुग्णालयाबाहेर पावसात भिजत ठेवला दरम्यान, दुसरीकडे भर पावसात एका मृतदेहाची हेळसांड करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयातील ही घटना सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तसेच, सरकारी रुग्णालयातील भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून नेटीझन्स आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे. एक तासाहून अधिक वेळ हा मृतदेह पावसात ठेऊन कर्मचारी गायब झाले होते. विशेष म्हणजे राज्याच्या वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांच्या जिल्ह्यातच घडला प्रकार घडल्याने राज्यातील सरकारी रुग्णालयात काय परिस्थिती असेल, राज्याच्या आरोग्य विभागाचे काय होत असेल? असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

बीड/महाराष्ट्र
आंतरराष्ट्रीय विशेष

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १० जुले २०२५
https://lokaarambh.com



# येत्या १४ तारखेला सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी, संपूर्ण राज्याचे लक्ष

शिवसेना पक्षाचे नाव आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निकाला विरोधात ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर येत्या १४ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होण्याची अपेक्षा आहे. दोन नंबर कोर्टात ही सुनावणी होणार आहे. १४ तारखेला हे प्रकरण सुप्रीम कोर्टात सूचिबद्ध झाल्याने आता दीड वर्षांनंतर या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणात सुनावणी होणार असल्याने महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या पार्श्वभूमीवर काय निकाल लागतो याची उत्सुकता लागलेली आहे. न्यायमूर्ती सूर्या कांत आणि न्यायमूर्ती जोयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे. या प्रकरणात शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रकरणात ज्याप्रमाणे निर्दे श दिले होते. त्याच प्रकारचे निर्दे श आपल्या प्रकरणात द्यावेत अशी मागणी उबाठा गटाने केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला काय दिले होते आदेश




राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रकरणात निकाल देताना अजितदादा पवार यांना राष्ट्रवादीचे चिन्ह वापरताना त्याची जाहीरात करण्याचे बंधन कोर्टाने घातले होते. अंतिम सुनावणीच्या अधिन तात्पुरते हे चिन्ह वापरण्यास दिले आहे अशी स्पष्ट कबुली अजितदादांना वर्तमान पत्रात करावी लागली होती. विशेष म्हणजे राष्ट्रवादी कांग्रेस प्रकरणात सूर्या कांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली होती. त्याच खंडपीठासमोर आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या याचिकेची सुनावणी होणार आहे.


## कविवर्य बाब भोरकर यांचे काव्य निसर्गवादी ,सौंदर्यवादी आणि भक्तीरसाने प्रेरित आहे प्रा. विनोद कांबळे

शिवछत्रपती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागा अंतर्गत कविवर्य बा. भ. बोरकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला याप्रसंगी
प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विनोद कांबळे यांची उपस्थिती होती अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले प्रा. कांबळे म्हणाले की कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या काव्यरचना निसर्गाशी नाते जपणारे आणि निसर्गाचे सजीव चित्रण करणारे आहे सौंदर्यवादी दृष्टिकोन मांडणारे आहे शब्दाची साधना हेच बोरकरांचे आयुष्य होते त्यांच्या काव्यात लयबद्धता आहे अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. कोठावळे म्हणाले की बोरकरांची काव्यसृष्टी जीवनानुभवाची अनुभूती देते त्यांच्या कविता वाचताना असे वाटते की शब्द नुकतेच वाचले जात नाही तर गाण्यासारखे ऐकू येतात त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले पद्मश्री, साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासनाने अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उत्तम जाधव



यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. विठ्ठल देखणे यांनी केले आभार डॉ. विलास महाजन यांनी मानले या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ. सुरेश नलावडे डॉ. सुभाष पोटभरे डॉ. हेमंत कुमार जैन डॉ. गांधी बानायत डॉ. तुकाराम गावंडे प्रा. संदीप सातोणकर प्रा. सचिन कदम आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## राक्षसभुवन येथे मराठा साम्राज्य विजयाचे स्मारक वस्तुसंग्रहालय उभारावे



बीड । प्रतिनिधी अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र वतीने मंगळवार दि. ०८/ ०७/२०२५ रोजी बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन त्यांना राक्षसभूवन ता. गेवराई जिल्हा बीड येथे मराठे निजाम याच्यात झालेल्या १० ऑगस्ट १७६३ च्या लढाईच्या मराठा साम्राज्य विजयाचे स्मारक, वस्तू संग्रहालय उभारावे यासाठी निवेदन दिले. याचा उद्देश नन्या पिढीला इतिहासातून प्रेरणा मिळेल यावेळी पश्चिम क्षेत्रिय संघटन सचिव डॉ राधाकृष्ण जोशी, प्रांत अध्यक्ष डॉ मुकुं द देवर्षी, डॉ रवी सातभाई, कोषाध्यक्ष प्रा शशिकांत पसारकर, बिड जिल्हा अध्यक्ष डॉ मुकुं द कुलकर्णी, डोळे सर व इतर उपस्थित होते.



खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त व आषाढी एकादशी निमित्त पाली जिल्हा परिषद सर्कल चे युवा नेते नवनाथ देवगुडे यांच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अभिषेक व प्रसादाचे आयोजन केले होते. या वेळी महाप्रसाद घेताना भाविक भक्त.

## कैलास चौधरी यांनी ३४ वर्ष प्रामाणिक सेवा केली -प्राचार्य डॉ .रजनी शिखरे

समाजामध्ये अनेक कार्यालयामध्ये विविध प्रकारचे लोक आपली सेवा आपापल्या परीने करीत असतात परंतु प्रामाणिकपणा, सचोटी आणि मितभाषी स्वभाव यामुळे कैलास चौधरी यांचे कार्य मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाला सदैव लक्षात राहील ,असे गौरवोद्गार आर . बी . अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रोफेसर डॉ . रजनी शिखरे यांनी काढले . ३० जून २०२५ रोजी आर .बी . अट्टल महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केलेल्या निरोप समारंभात त्या बोलत होत्या . अट्टल महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर कैलास साहेबराव चौधरी यांच्या



सेवानिवृत्तीबद्दल एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . महाविद्यालयाच्या वतीने कैलास चौधरी व त्यांच्या पत्नी सौ. सुलोचना चौधरी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सपत्निक सत्कार करण्यात आला .यावेळी महाविद्यालयाचे लघुलेखक सुदर्शन निकम, गंगापूर येथील मुक्तानंद महाविद्यालयातील कर्मचारी शिवाजी खिंडकर, भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. सुदर्शना बडे, सेवानिवृत्त शिक्षक अर्जुन माने, सेवानिवृत्त अधीक्षक गोपीनाथ हराळे, तसेच कैलास चौधरी यांच्या सूनबाई धनश्री चौधरी यांनी बद्दल कौतुकास्पद मनोगते व्यक्त केली . कार्यक्रमाची संचलन सुप्रसिद्ध वक्ते तथा मराठी विभागाचे प्रा . डॉ . समाधान इंगळे यांनी केले होते . आभार प्रा . डॉ प्रदीप दहिंडे यांनी मानले . यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना कैलास चौधरी यांनी बीड जिल्ह्याचे शिल्पकार, गेवराई तालुक्याचे आश्रयदाते आदरणीय शिवाजीरावदादा पंडित व माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली . तसेच जयभवानी कारखान्याचे तत्कालिन संचालक कै . विठ्ठलराव माने, क्रीडा विभागाचे सेवानिवृत्त विभाग प्रमुख प्रा . एल . आर धुमाळ यांचेही मोठे सहकार्य लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली .महाविद्यालयाने दिलेले प्रेम आणि मिळालेला आनंद यामुळे पुढील आयुष्यात मी निश्चितच आणखी समाजाची सेवा करीन ,अशा भावना कैलास चौधरी यांनी व्यक्त केल्या . कैलास चौधरी यांना दोन मुले असून एक शाळेत शिक्षक तर एक बँकेत नोकरीला आहे . १ ऑक्टोबर १९९१ ते ३० जून २ २०२५ या ३४ वर्ष कालावधीत त्यांनी विना तक्रार, नियमानुसार महाविद्यालयाला सेवा दिली.

# कॉम्रेड मॅरेथॉनमधील अनुभव भविष्यात प्रेरणादायी ठरतील : देव चौधरी

# अंबाजोगाईत आषाढीला रंगला राज्यातील कॉम्रेड धावपटूंचा मेळा

बीड । प्रतिनिधी महाराष्ट्रातील खेळाडुंमध्ये प्रतिभेची कमतरता नाही. केवळ त्यांना संधी मिळण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राच्या मातीत तयार होणारे अनेक खेळाडू हे आता जागतिक पातळीवर पोहचत आहेत. दक्षिण आफ्रिकेतील
कॉम्र ेड सारख्या खडतर स्पर्धेत यशस्वी होणे हा साधा विषय नाही. ही कॉमेंड मॅरेथॉन म्हणजे मानसिक आणि शारीरिक निरिक्षण आणि परिक्षण होय. दक्षिण आफ्रिकेतील मॅरेथॉनमधील अनुभव भविष्यात आमच्यासाठी प्रेरणादायी ठरतील असे मत कॉम्र ेड मॅरेथॉनमध्ये भारतातून दोनदा रौप्य पदक पटकविणारे पुसद येथील धावपटू देव चौधरी यांनी व्यक्त केले.जगातील अत्यंत खडतर समजली जाणारी ९० किलोमीटरची कॉम्र ेड मॅरेथॉन दक्षिण आफ्रिका येथे गेल्या ९९ वर्षांपासून आयोजित केली जाते. यावर्षी ८ जून रोजी अतिशय खडतर असणारी कॉम्र ेड मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. यामध्ये भारतातून ४२५ तर महाराष्ट्रातून १२४ स्पर्धक सहभागी झाले होते. यातील ११ कॉम्र ेड यांचा सत्कार अंबाजोगाईच्या हॉटेल पियुष इन मध्ये पार पडला. रनर आकाश कवडे यांच्या आयोजनातून आषाढीनिमित्त अंबाजोगाईत राज्यातील कॉम्र ेड धावपटूंचा मेळा रंगला होता. अध्यक्षस्थानी माजी आमदार पृथ्वीराज साठे तर प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण अफ्रिकेच्या कॉम्र ेड मॅरेथॉनमध्ये भारतातून दोनदा रौप्य पदक पटकविणारे पुसद येथील धावपटू देव चौधरी, रनर्स कोच दादासो सत्रे ,अंबाजोगाईचे पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, केमिस्ट संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अरुण काळे उपस्थित होते. यावेळी दक्षिण आफ्रिकेत झेंड े रोवणाऱ्या बीडसह राज्यभरातील ११ कॉम्र ेड धावपटूंचा सत्कार करण्यात आला. पुढे देव चौधरी म्हणाले की, कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये धावताना तांत्रिक व शारीरिक अडचण आली नाही. मॅरेथॉनदरम्यान आयोजकांनी अत्यंत चांगली व्यवस्था ठ ेवली होती. जगभरातील धावपटूंशी संवाद साधल्यानंतर बऱ्याच नवनवीन गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या. त्यांचा आहार, सरावाची पद्धत, विशिष्ट व्यायाम आदी गोष्टी समजून घेतल्या. त्या गोष्टी आम्ही आता युवा धावपटू व इतर सदस्यांना सांगणार आहोत. भविष्यात त्या गोष्टी आमच्यासाठी फायदेशीर ठरतील, असा अनुभव सांगितला. सुत्रसंचालन बीड येथील कल्याण कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास डॉ.शुभदा लोहिया, डॉ.राहुल धाकडे ,महेश लोमटे, धनराज काळे, सतीश झंवर, नारायण मु ंडे, संतोष गरड, शरद खिल्लारे, राहुल पवार, कल्याण खोसे, बाबा मु ंडे आदी उपस्थित होते.दक्षिण आफ्रिकेत झेंडे रोवणाऱ्या ११ कॉम्र ेडांचा सत्कारअंबाजोगाई येथील धावपटू आकाश कवडे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात यावर्षी दक्षिण अफ्रिकेतील कॉम्र ेड मॅरेथॉनमध्ये महाराष्ट्राचा झेंडा रोवणाऱ्या ११ कॉम्र ेडांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये देव चौधरी (पुसद), डॉ.आरती झंवर, डॉ. ब्रिज मोहन झंवर (लातूर), डॉ.संजय जानवळे (बीड), संतोष भोकरे (बीड), हरिभाऊ ठोंबरे (बीड), संजीव भार्गव (लातूर), कविता जाधव (मिरज), संतोष वाघचौरे (इंदापूर), गोपीनाथ मोरे (इंदापूर) संदीप जाधव (इंदापूर) यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार




करण्यात आला.हा क्षण पुढील पिढ्यांना आदर्शवत : पृथ्वीराज साठेमहाराष्ट्राच्या शौर्यगाथेचा वारसा सर्वच कॉम्र ेडांनी जपला आणि दक्षिण आफ्रिकेत जाऊन बीडसह महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे. हा क्षण फक्त गौरवाचा नाही, तर पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारा आणि आदर्शवत ठरला आहे. आपण महाराष्ट्राच्या मातीचा अभिमान आहात. कॉम्र ेड मॅरेथॉनला बीड जिल्ह्यातून पुढील वर्षी आणखी काही धावपटू नक्की पोहोचतील असे मत माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी व्यक्त केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com